डॉ. निशा भंडारे
(पृष्ठ क्र. १६७)



# फुले-शाहू-आंबेडकर : विचारांची विश्वव्यापकता

संपादक
डॉ. रोहिदास जाधव
डॉ. संदीप रतन कांबळे

# फुले-शाहू-आंबेडकर :
# विचारांची विश्वव्यापकता

संपादक
डॉ. रोहिदास जाधव
डॉ. संदीप रतन कांबळे

यशोदीप पब्लिकेशन्स्,
पुणे-३०.

# फुले-शाहू-आंबेडकर : विचारांची विश्वव्यापकता

संपादक : डॉ. रोहिदास जाधव, डॉ. संदीप रतन कांबळे

**Phule-Shahu-Ambedkar : Vicharanchi Vishwavyapakata**

Editor : Dr. Rohidas Jadhav, Dr. Sandip Ratan Kambale


© डॉ. रोहिदास जाधव
भोर, जि. पुणे
संपर्क क्र.: ९२२०१२२०८५

प्रथम आवृत्ती
३१ जुलै २०१९

अक्षरजुळणी
सुरेश यादव, मधुरा धुंडे

मुखपृष्ठ
निखिल लंभाते

प्रकाशक
यशोदीप पब्लिकेशन्स,
२१७ ब, जोरी निवास,
नारायण पेठ, पुणे-३०.
संपर्क क्र. - ९८५०८८४१७५,
९०२८७३६००१,
(०२०)४१२१७४४१

मुद्रक
समर्थ प्रोसेस, पुणे.

मूल्य : ₹ १८०/-

ISBN : 978-93-86387-90-5


आदरणीय डॉ. बीदन आबा (मॉरिशस),

...आपणास कृतज्ञतापूर्वक...

वाटतं,

'नारी की कोई जात नही, वह तो संसार का आधार
बरसों से जुल्म सहनेवाली, क्या के लाचार नारी है?
दिलोदिमाग की लाचारी छोडो, अपने अस्तित्व को पहचानो,
संविधान के अधिकार जानो, अंधकार से बाहर निकलो,
इन महामानवों का त्याग, कभी मत भूलो।

बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर या महामानवांच्या संघर्षमयी कार्यकर्तृत्वास शत कोटी कोटी प्रणाम!

**–प्रा. डॉ. वीणा राऊत (सचिव)**
शिक्षक साहित्य संघ (महाराष्ट्र राज्य) नागपूर
साईनाथ कला व विज्ञान महाविद्यालय, नागपूर.

◆◆◆



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रप्रेम : जलविद्युत क्षेत्रातील योगदान

**– प्रा. डॉ. निशा किशोर भंडारे**

समानतेचा संदेश संतांपासून आधुनिक सामाजिक कार्य करणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोळकरांपर्यंत दिलेला दिसतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीधर्मांच्या मावळ्यांना घेऊन स्वराज्य मिळावेत यासाठी प्रयत्न केले. म. जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज यांनी ही समतेसाठी मोठे योगदान दिले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेचे सूत्र घेऊन संविधान लिहिले, पण अजूनही समतेचे दिवस आलेत का ? हा प्रत्येकाने स्वतःला विचारावे. या ना त्या कारणाने डॉ. बाबासाहेबांच्या देशप्रेमावर प्रश्न उठवले. भारताच्या जडणघडणीत कोणत्याही भारतीय नेत्यापेक्षा आपल्याकडे अधिक योगदान बाबासाहेबांचे आहे. भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भात भारतीय राष्ट्रवादाची मांडणी केलेली दिसते. 'देश' ही वस्तुनिष्ठ समूह भावना व सद्सद्विवेक शक्तीची भावना आहे. बाबसाहेबांनी लिहिलेला 'थॉट्स ऑफ पाकीस्तान' ग्रंथात वंश, भाषा, भूगोल व संस्कृती या गोष्टी राष्ट्रीयत्वाच्या प्राथमिक गरजा नव्हेत, हे अनेक प्रकारांनी पटवून दिले. त्यांनी 'देश' या संकल्पनेचे अनेक धर्मांध व अंधश्रद्धा असलेली बंधने तोडून या संकल्पनेला विशुद्ध जीवनचिंतनाची अर्थपूर्ण संकल्पना मानली ते म्हणतात ''भारतीय जातिव्यवस्थेचे उच्चाटन ही भारतीय देशप्रेमाची पहिली पायरी'' राष्ट्रापेक्षा कोणीही मोठे नाही. व्यक्तिपूजेपेक्षा व्यक्तिचिकित्सेवर

अधिक भर दिला आहे. राष्ट्रवाद विवेकशील मानवतावादी स्वभावाचा होता. तो मानव निष्ठेला महत्त्व देणारा होता. सर्वांचे कल्याण करणारा उदात्त त्यांनी मांडला.

डॉ. आंबेडकर अमेरिकत शिक्षण घेत होते. तेव्हा त्यांची भेट स्वातंत्र्यसेनानी लाला लजपतराय यांच्याशी झाली. त्यांनी बाबासाहेबांना स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेण्यात सांगितले तेव्हा त्यांनी स्पष्ट नकार दिला व त्यांनाच स्वातंत्र्याविषयी सांगितले. "माझ्या मते, स्वातंत्र्य संकल्पना दोन टप्प्यांवर विभागली आहे. १. देशाचे स्वातंत्र्य, २. जनतेचे स्वातंत्र्य. देश स्वतंत्र होईल बहुजन जनतेचे काय ? ते गुलामगिरीचे भक्ष्य बनतील अशाने विकास होऊ शकत नाही. उदा. ४ जुलै १७७६ रोजी अमेरिका ब्रिटिशांच्या वर्चस्वातून स्वतंत्र झाली. पण निग्रो लोकांना कित्येक वर्षे गुलामगिरीतच जीवन जगावे लागले. तिकडे वर्णभेद आपल्याकडे वर्णभेद (चातुर्वर्ण्य), परंतु असे नाही की ते स्वातंत्र्याच्या विरोधात होते. १९३० साली सविनय कायदेभंगाची चळवळ झाली. पनवेलजवळील चिरनेर येथे काँग्रेसप्रणीत जंगल सत्याग्रह झाला. मामलेदार सरकारी नोकर मारले गेले. पोलिसांनी दडपशाही करून ४९ जणांवर खटले भरले. बाबासाहेबांनी वकीलपत्र घेतले व २० जणांची निर्दोष सुटका केली. दुसरे उदा. रघुनाथ कर्वे यांनी पुण्यात संततिनियमनावर काम केले. त्यांच्यावर पुण्यातील सनातनी विचाराच्या लोकांनी खटला भरला. कोणीही त्यांचे वकीलपत्र घेतले नाही. बाबासाहेबांनी वकीलपत्र घेऊन कर्व्यांना न्याय मिळवून दिला. असे कितीतरी दाखले त्यांचे देशप्रेमाचे द्यावे. तळागाळातील बहुजन समाजाला समानतेच्या पातळीवर आणण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी सर्वस्वाचा त्याग केला. आदर्श भारतीय संविधान निर्मितीचे कार्य केले. भारताच्या एकात्मतेचा विचार करूनच भारताचा मूळ धम्म स्वीकारला."

त्यांनी पर्यावरण, जलव्यवस्थापन, धरणे, विद्युतनिमिर्ती प्रकल्प, शेती विकास, औद्योगिकीकरण, रोजगारनिर्मिती, पर्यायी उद्योग, भांडवलनिर्मिती, शिक्षण, स्थलांतर, परदेशी, व्यापार वित्तिय व द्रव्यविषयक अभ्यास केला. याविषयी अत्यंत परखडपणे आपले विचार मांडले. शासनाने समाजवादी भूमिका ठेवावी, असे त्यांचे मत होते. सामान्य जनतेसाठी शिक्षण, आरोग्य



आणि इतर सार्वजनिक सुविधा शासनाने कल्याणकारी सुविधा म्हणून दिल्या पाहिजेत, ही त्यांची भूमिका होती.

डॉ. आंबेडकर व्हाइसरायच्या मंत्रिमंडळात असताना कामगारमंत्री म्हणून कार्यरत होते. इ.स. १९४२ ते ४५ या कालावधीत त्यांनी कामगारासाठी धोरण आखले. कामगार चळवळीला एक नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला. या देशात स्वस्त दराने धम्मशक्तीच्या जोरावर दुनियेमध्ये स्थान प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करावा, हा दृष्टिकोन ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आणि देशातील धनिकांनी स्वीकारला होता. हा अन्यायकारक वाटत होता म्हणून बाबासाहेबांनी त्याला एक वेगळी दिशा देण्याचे ठरविले हे करीत असताना कामगारांची उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना आखता येतील, याला प्राधान्य दिले. आपले म्हणणे मांडण्यासाठी कामगारांना संप करण्याचा मूलभूत अधिकार दिला. अधिकार सातत्याने वापरले तर कामगारांचे अहित होईल. कायदेमंडळामध्ये वेठबिगारांच्या प्रश्नासंबधी कायदे करताना भाषणात म्हणाले, "मी कायदे कितीही करीन, पण त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेला जागरूक रहावे लागेल." कामगारांसाठी कायदे करतांना कामगार धोरण मंत्रिमंडळात मांडले. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि सन्मान काम करण्याचे हे सूत्र कृतीत दिसले पाहिजे. कामगाराविषयक वाद मिटवण्यासाठी त्रिपक्षीय मजूर न्यायाधिकारणाची शिफारस केली. कामगार युनियनबरोबरच महिलांना बाळतपणासाठी पूर्ण वेळ पगारी रजा देण्याचे धोरण राबविले. स्त्री कामगारांसाठी कलम (३९) (९) नुसार पगारदार पुसण्याइतकाच पगार दिला. स्त्रियांना रात्री काम करण्यास बंदी घातली. कामाचे तास ठरवून दिले. असे क्रांतिकारी धोरण राबवणारे डॉ. आंबेडकर हे पहिले कामगारमंत्री होते. रात्री काम करण्यास बंदी घातली. कामाचे तास ठरवून दिले असे क्रांतिकारी धोरण राबवणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले कामगार मंत्री होते.

१९४२ साली दिल्लीमध्ये १ ली त्रिपक्षीय कामगार परिषद झाली. यात कामगार प्रतिनिधी, मालकाचे प्रतिनिधी, प्रशासकीय प्रतिनिधी यांच्यात एकवाक्यता घडवून आणण्यात ते यशस्वी झाले. जेव्हा संपूर्ण देशामध्ये मजुरांसंबधीचे धोरण ठरविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली, तेव्हा त्यांनी

या देशामध्ये कामगार आयुक्त व मुख्य कामगार आयुक्त संस्थेची राज्याराज्यांत निर्मिती केली. किमान वेतन कायद्याला चांगले स्वरूप देण्याची व्यवस्था केली. संपूर्ण सार्वजनिक आयुष्यात सातत्याने कामगारांच्या हिताचाच विचार केला. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या राजकीय सामाजिक आर्थिक व संविधान निर्मितीत दिसते. सेठ-सावकारांचे स्वातंत्र्य म्हणणे देशाचे स्वातंत्र्य नव्हे असे ते म्हणत. १९३८ साली काँग्रेस सरकारने आणलेल्या ट्रेड डिस्ट्रट बीलाविरुद्ध त्यांनी आंदोलन केले. संप करणे हा कामगारांचा हक्क असू शकत नाही. अशी भूमिका बिलात मांडली होती. बाबासाहेबांनी त्याला प्रखर एकट्याने विरोध केला. संप बंदी करणे किंवा संपाकरिता कामगारांना शिक्षा करणे म्हणणे त्यांना गुलाम करण्यासारखे आहे, अशी परखड मते मांडली. १९४२ साली मंत्रिमंडळात कामगारांना मूलभूत हक्क बहाल केले. कामगार कल्याण हे सरकारचे कर्तव्य ठरविले. कामगार संघटनांना मान्यता दिली. कामगारांचे आरोग्य आणि जीवन धोक्यात आणणारी परिस्थिती बदलून टाकली. या पुढे जाऊन मजुरांच्या समस्या सोडविण्यासाठी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर १५ ऑगस्ट १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. या पक्षाला मुंबई आणि सी.पी. अ‍ॅण्ड खरोर प्रदेशातील विधानसभेच्या निवडणुका १९३७ मध्ये लढविल्या. त्यात मजूर पक्षाचे उमेदवार निवडून आले. १९३८ मध्ये 'औद्योगिक विवाद विधेयक' सादर केले. यात विशिष्ट परिस्थितीत कामगारांचा संप बेकायदेशीर ठरविण्याची तरतूद होती. त्याला कडाडून विरोध केला व औद्योगिक विवाद विधेयक म्हणजे मजुरांकरिता काळा कायदा होय, अशा शब्दांत निर्भत्सना केली व गिरणी कारखान्यातील कामगारांचा एक दिवसाचा संप ७ नोव्हेंबर १९३८ रोजी घडवून आणला. भारतीय इतिहासात हा सर्वात मोठा संप होता. डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वात जमनादास मेहता, सौ. परूळेकर, कॉ. डांगे इ. सर्व नेत्यांनी सहभाग घेतला व तो यशस्वी करून दाखविला. या ऐतिहासिक संपामुळे डॉ. आंबेडकर हे कामगारांचे नेते म्हणून प्रसिद्धीस आले. व्हाईसरायच्या मंत्रिमंडळात असताना बाबासाहेबांकडे जलसिंचन, ऊर्जा खाते होते. त्या वेळी त्यांनी जलविद्युत धरणे, नदीजोड प्रकल्पांचा पाया घातला. बारमाही वाहणाऱ्या उत्तरेकडील नद्या दक्षिणेकडे वळवाव्यात, अशी सूचना केली. त्यांच्याद्वारे जलसाधनाच्या



विकासाच्या उद्दिष्टांसाठी प्रादेशिक संकल्पनेचा स्वीकार करून राज्यांतर्गत नद्यांच्या प्रकल्पाचे जलव्यवस्थापन करण्यासाठी प्रथम नदी खोरे प्राधीकरणाच्या महामंडळ संकल्पनेचा स्वीकार केला. त्या प्राधिकरणांच्या अंतर्गत दामोदर नदी खोरे, हिराकुड नदी खोरे, सोन नदी खोरे प्रकल्पाची सुरुवात त्यांनी केली. जलसिंचन व विद्युत उर्जेची नेत्रदीपक प्रगती झालेली दिसून आली आहे. त्यांनी भारतीय घटनेमध्ये आंतरराज्यीय नद्यांच्या विकासासाठी योग्य त्या कायद्याची तरतूदही करून ठेवली आहे. ऊर्जा आणि पाण्याचा वापर करून भारतातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होऊ शकते, असे मत मांडले. अल्पभूधारक शेतकऱ्यांविषयी ते म्हणतात, ''शेतीची कमी उत्पादकता ही अपुऱ्या भांडवली गुंतवणुकीमुळे आहे. शेतीमध्ये दरडोई उत्पन्न कमी असल्यामुळे कारण म्हणजे लोकसंख्येचा शेतीवरील पडलेला प्रचंड भार व त्यामुळे शेतीमधील दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी शेतावरील लोकसंख्येचा भार कमी करणे आवश्यक आहे आणि तो भार फक्त औद्योगिकीकरणामुळेच कमी होऊ शकतो. औद्योगिकीकरण हीच शेतीच्या विकासाच्या बाबतीत गुरुकिल्ली आहे. शेतीतील औद्योगिकीकरणामुळे शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होईल. त्यामुळे जमिनीचा आकार वाढेल. त्याचबरोबर दरडोई उत्पन्न वाढेल, बचत वाढेल व भांडवली गुंतवणूक वाढेल व वाढत्या गुंतवणुकीमुळे उत्पादकता वाढून शेती अस्थिरतेच्या चक्रव्यूहातून बाहेर पडून आधुनिकीकरणाच्या मार्गावर अग्रेसर होईल. म्हणजेच आधुनिकीकरण केल्याशिवाय शेतीचा विकास नाही. यासाठी आर्थिक नियोजनाची आवश्यकता आहे. या अर्थव्यवस्थेत सरकारचा हस्तक्षेप व सहभाग असणे आवश्यक आहे.

१९४२-४४ च्या स्वातंत्र्यपूर्व काळातच जल-विद्युत खात्याचे मंत्री असतानाच विकासाच्या विविध समित्यांवर ते होते. केंद्रीय मंत्रिमंडळाचे सदस्य होते. सिंचन व विद्युत धोरण समितीचे अध्यक्ष होते. या संदर्भातील विकासासंबंधी अभ्यास त्यांचा होता. त्यांच्या प्रभावाखाली मार्गदर्शनाने भारतातील जल व विद्युत धोरणांचा आराखडा तयार झाला. फार मोठे योगदान आहे. यासाठी केंद्र व राज्य सरकारला कामाची विभागणी करून दिली होती. म्हणजेच वीज, पाणी, पाटबंधारे, वाहतूक आणि तंत्रज्ञान यात अमूलाग्र बदल घडवून आणले. कारण बाबासाहेब भारतातील कामगारांचे प्रश्न, समस्या

ओळखत होते. देशाच्या नियोजनबद्ध आर्थिक विकासात श्रमिक आणि गरीब वर्ग यांना महत्त्वपूर्ण स्थान असावे अशी डॉ. बाबासाहेबांची भूमिका होती. जल ही नैसर्गिक संपत्ती आहे ती सगळ्यांची आहे. पाणी म्हणजे जीवन तिचे वितरण व्यवस्थित झाले पाहिजे. पाण्याच्या अतिरिक्ततेच्या समस्यांकडे वेगळ्या दृष्टीने पाहिले पाहिजे. काही लोक अतिरिक्त पाण्याच्या वापराबाबत एकाच बाजूने भिंती बांधून अतिरिक्त पाणी थेट समुद्रात जावे ही संकल्पना समितीतील इतर सदस्यांची होती. त्याविषयी डॉ. आंबेडकर खेद व्यक्त करतात व म्हणतात, ''नदी किनाऱ्याला बंदिस्त करण्याचा विचार गैर आहे. विविध ठिकाणी पाण्याचे जतन करणे आणि त्यांचा बहुउद्देशीय वापर करणे म्हणजे मोठ्या प्रमाणात शेती ओलीताखाली आणावी. त्याचबरोबर विद्युतशक्ती मोठ्या प्रमाणात तयार करून शेतीसाठी व औद्योगिक विजेचा वापर करावा.'' हा विचार १९४५ मध्ये मांडला. भारतात मोठ्या प्रमाणावर विद्युतपुरवठा केला पाहिजे. त्यामुळे औद्योगिकीकरणाला वीज स्वस्त मिळेल व सर्वसामान्य मजूर औद्योगिकीकरणाच्या क्षेत्रात सामील होतील. दारिद्र्यावर मात करतील, असा दूरगामी विचार करणारे डॉ. बाबासाहेब यातून दिसतात.

बहुउद्देशीय प्रकल्पात पाण्याचे जतन करून मोठे धरण बांधले. त्यातून वीज व जलसिंचन वाढविणे ही काळाची गरज आहे, असे ते म्हणतात. दामोदर नदी प्रकल्पाचा विकास हा अमेरिकेतील टेनेसी नदी खोरे प्रकल्पाच्या कार्यपद्धतीवर असावा म्हणून त्यांच्या प्राथमिक कामाचा सखोल अभ्यास केला. यासाठी चार इंजिनिअर्सला अमेरिकेला पाठविले. कामगारांच्या वाहणाऱ्या घामाची अन् रक्ताची खरी जाणीव ठेवून पहिले सिद्धांतिक प्रत्यक्ष महान कार्य केले. बिहारच्या धनबाद येथील भुलनबरारी या ४०० फूट खोल कोळशाच्या खाणीत स्वतः उतरले. राणीगंजलाही भेट दिली. मजुरांची सुरक्षितता, प्रसाधन व्यवस्था, आरोग्यव्यवस्था इ.ची जातीनं पाहणी केली व अमूलाग्र सुधाणा घडवून आणल्या. तसेच तरुण बेरोजगारीचा प्रश्नही त्यांनी सोडविला. जे अनुभवी आणि अर्धशिक्षित, ग्रॅज्युएट तंत्रज्ञ होते, ते नोकरीसाठी भटकत असत. त्यांच्यासाठी बेरोजगार तरुणांची नोंदणी सेवायोजना कार्यालय (एम्प्लॉयमेंट एक्सेजेंच) ची राज्यातील जिल्हानिहाय स्थापना केली. हे बेरोजगार तरुणांच्या दृष्टीने किती उपयुक्त आहे हे आपणच पाहतोच आहोत.



अशाप्रकारे डॉ. बाबासाहेबांचे जलविद्युत क्षेत्रातील योगदान किती मोलाचे होते. प्रत्येक घटकाचा त्यांनी कसा अभ्यास केला, हे लक्षात येते. दामोदर प्रकल्पासाठी संसदेत कायदा पास करून घेतला. या सगळ्या लढ्यांत ते एकांडे शिलेदार म्हणून लढत होते. दामोदर धरणाच्या उद्घाटन प्रसंगी ते आपल्या भाषणात म्हणतात, ''तुम्ही एक धरण बांधत नाही, तर देश बांधत आहात.'' खरंच या देशात जापसधारणाचा पहिला विचार त्यांनी मांडला. वीजनिर्मिती प्रकल्प, पाणी जतन करण्यासाठी लघु-मध्यम मोठे जल प्रकल्पाचे आराखडे केले. त्यानुसार सर्व प्रकल्प कार्यान्वित केले. शेती, पर्यावरण, शिक्षण, औद्योगिकीकरण, समाजकारण, राजकारण, धार्मिक परिवर्तन अशा अनेक विषयांना नुसता स्पर्श केला नाही, तर त्यासंबंधित त्या त्या घटकांना न्याय मिळवून दिला.

वीजनिर्मिती होते, पण आज शेती विकासासाठी लाईट नाही. कारखानदाराला २४ तास लाईट, तर शेतकऱ्यांना आठच तास. त्यात शेतकऱ्यांपेक्षा कारखानदाराकडे झुकतं माप न्याय व शेतकऱ्यांवर बळीराजावर अन्याय केला जातो. सर्व राजकीय पक्षांनी राजकारण बाजूला ठेवून डॉ. आंबेडकरांच्या शेतीबाबतीत, वीज, पाणीबाबतीत योजनांची व विचारांची अंमलबजावणी केली, तर शेतकऱ्यांवर स्वहत्या करण्याची वेळच येणार नाही व देश प्रगतिपथावर राहील व महासत्ताक बनण्यापासून त्याला कोणीही रोखू शकत नाही.

संदर्भग्रंथ

* डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रप्रेम - डॉ. गौतम बेंगाळे.
* डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड २, ३ - डॉ. नरेंद्र जाधव.

- प्रा. डॉ. निशा किशोर भंडारे
मराठी विभाग प्रमुख
मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५.
मो.नं. ८८०६०३८४७५
email : nishakbhandare@gmail.com

◆◆◆